वन विभागाची पुनर्रचना नवीन परिक्षेत्र राऊन्ड्स व बिट्सची निर्मिती या योजनेत्तर योजनेतील ४५३ पदांना मुदतवाढ सन २०१७-१८ मध्ये चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक:- एफडीएम -२०१७/प्र.क्र.१६/फ-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १८ जानेवारी, २०१८

<u>वाचावे :</u>- १) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०८.०१.२०१८

२) शासन निर्णय, महसूल व वनविभाग, क्रमांक-एफडीएम-२०१७/प्र.क्र.१६/फ-२, दि.२३.१०.२०१७

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-३/योजनेत्तर/प्र.क्र.१२/१६-१७/१९७६, दि. १९.०१.२०१७

<u>शासन निर्णय</u> :-

वन विभागाची पुनर्रचना नवीन परिक्षेत्र राऊन्ड्स व बिट्सची निर्मिती◦ या योजनेत्तर योजनेतील ४५३ पदांना संदर्भ २ च्या शासन निर्णयान्वये दि. ०१.१०.२०१७ ते ३१.१२.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मंजूरी देण्यात आली होती. आता खाली दर्शविलेल्या विवरण पत्रातील ४५३ अस्थायी पदे ही वनविभागाच्या २५०२५ या मंजूर आकृतीबंधात समाविष्ट असल्याने या ४५३ अस्थायी पदांना वित्त विभागाचा शासन निर्णय संदर्भ क्र.१ अन्वये दि.०१.०१.२०१८ ते २८.०२.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

याबाबत वेतनावरील खर्च -प्रधान शीर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, (योजनेतर) ०१ वनीकरण, १०१ वनसंधारण, विकास व पुननिर्मिती (०१) प्रशासन व संरक्षण (०१)(०१) प्रशासन व संरक्षण (२४०६ ००९६) ०१ वेतन◦ या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१७-१८ यावर्षी त्याखालील मंजूर होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा. या कालावधीमध्ये मंजूर पदांचा आढावा घेऊन, सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

प्रस्तुत शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. पदनि २०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०८.०१.२०१८ विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११८१३००११७६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.01.18 13:03:49 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रतिलिपी :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर

२) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व).

३) मुख्य वनसंरक्षक, मध्यवर्ती मुल्यांकन घटक, नागपूर.

४) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता)/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य,नागपूर.

६) वित्त विभाग, व्यय १०/अर्थसं-६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

७) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

८) जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ/नागपूर/चंद्रपूर/पुणे/नाशिक/औरंगाबाद

९) कार्यासन अधिकारी, ब-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

१०) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:-एफडीएम -२०१७/प्र.क्र.१६/फ-२, दि. १८.०१.२०१८ सोबतचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-

वनवृत्त	संवर्ग निहाय पदे								
	विभागीय वन अधिकारी	सहाय्यक वनसंरक्षक	वनक्षेत्रपाल	वनपाल	लेखापाल	लिपिक	कार्यालय अधिक्षक	वनरक्षक	**एकूण**
वन्यजीव (पूर्व) नागपूर	०	१	०	०	२	३	०	३६	**४२**
वन्यजीव (पश्चिम मुंबई)	०	०	०	०	२	१२	०	२२	**३६**
नागपूर	०	१	२	४	१३	४	४	१३	**४१**
अमरावती	०	१	०	०	७	९	०	०	**१७**
नाशिक	०	३	०	०	११	१०	३	१४	**४१**
ठाणे	०	२	०	०	१६	३	०	३१	**५२**
औरंगाबाद	१	०	०	६	५	०	०	५४	**६६**
यवतमाळ	०	१	२	०	७	२	३	४	**१९**
धुळे	०	१	०	०	२	१	०	२०	**२४**
कोल्हापूर	०	२	०	०	१०	३	०	११	**२६**
चंद्रपूर	०	२	०	०	१	१	०	२	**६**
गडचिरोली	०	१	०	०	२	०	२	३९	**४४**
पुणे	०	०	०	०	०	०	०	१२	**१२**
मेळघाट व्या.प्र. अमरावती	०	०	०	१३	३	१	०	१०	**२७**
एकूण	**१**	**१५**	**४**	**२३**	**८१**	**४९**	**१२**	**२६८**	**४५३**

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.01.18 13:04:08 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव
महसूल व वन विभाग